‘पोलिसांच्या इमारतींना नवा टच’

दुरुस्तीसाठी वीस कोटी; कामकाजास मिळणार गती

■ नाशिक । प्रतिनिधी

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिसांच्या अधिपत्याखाली असलेल्या इमारतींच्या दुरुस्तीसाठी शासनाने अंदाजित वीस कोटी रुपयांची मर्यादा आखली आहे. त्यापैकी सात कोटी रुपये मार्च २०२६ पर्यंत खर्च होणे अपेक्षित असल्याने शहरातील बॅरेक्स व इमारतींच्या दुरूस्तीबाबत अंदाजपत्रक सादर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र देण्यात आले आहे.

त्यामध्ये दुरूस्ती अपेक्षित ठिकाणांची यादी देण्यात आली आहे. सन २०२६-२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर शहर पोलिसांनी ‘एआय’ आधारित वेबसाइट सुरू करून नागरी संवादावर भर दिला आहे. शहरातील प्रमुख चौकांत ‘एआय’ आधारित कॅमेरे बसविण्यात येत असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांना ‘एआय’ प्रशिक्षण देण्यात आले आहे.

आता प्रत्यक्ष कामकाजासह दुरूस्तीला सुरूवात होत आहे. आगामी सिंहस्थात भारतासह विदेशातून एक कोटीपेक्षा जास्त भाविक येण्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. कायदा व सुव्यवस्थेसाठी शहरातील साडेतीन हजार पोलिसांसह पंचवीस ते तीस हजार अतिरिक्त मनुष्यबळ तैनात राहणार आहे. गर्दी नियंत्रणासह आपत्ती व्यवस्थापनाकरीता पोलिसांनी तयारी सुरू केली आहे. पोलीस अधिकारी-कर्मचारी, होमगार्डच्या राहण्यासाठी नियोजन सुरू आहे.

त्यासाठी सिंहस्थ मुख्यालय उपायुक्तांनी बांधकाम विभागाला पत्र देत दुरूस्तीचे अंदाजपत्रक मागविले आहे. संबंधित ठिकाणांची पाहणी करण्यासाठी सिंहस्थ कक्षाचे कर्मचारीदेखील बांधकाम विभागासोबत असतील. हे अंदाजपत्रक सादर झाल्यानंतर प्रस्ताव मंजुरीनंतर प्रत्यक्ष दुरूस्तीला सुरूवात होण्याची शक्यता आहे. सिंहस्थ कक्षाचे कर्मचारी त्यासाठी सोबत दिले जाणार आहेत, असे समजते.

पोलीस ठाणे/ठिकाण	जुने ‘बॅरेक्स’
पोलीस मुख्यालय	१४
भद्रकाली	२
अंबड	१
पंचवटी	२
पोलीस अकादमी	२
सातपूर	३
पोलीस वसाहत, पाथर्डी फाट	२ बीएचके २८ फ्लॅट
बॉम्बशोधक व नाशक पथक	१
दहशतवादी विरोधी पथक भद्रकाली	१
अंबड शेड, बॅरेक बांधकाम	१
आडगाव	१
इंदिरानगर पहिला मजला	१
इंद्रकुंडजवळील मनपा इमारत (भाडेतत्त्वावर)	१

डेंग्यू रोखण्यासाठी मनपाकडून उपाययोजना

■ नाशिक । प्रतिनिधी



शहरात डेंग्यूचा वाढता धोका लक्षात घेता नाशिक महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपाययोजना गतीमान केल्या आहेत. तरी ऑगस्टच्या पहिल्या १२ दिवसांत डेंग्यूचे तब्बल ३१ रुग्ण आढळून आले आहे.

दरम्यान डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी मनपाच्या मलेरिया विभागाने विशेष मोहीम सुरू केली आहे. शहरातील सर्व सहा विभागांमध्ये डास उत्पत्ती केंद्रांचा शोध घेऊन ती तत्काळ नष्ट केली जात आहेत. पावसामुळे साचलेल्या पाण्याच्या डबक्यांमुळे डेंग्यू पसरविणाऱ्या डासांची संख्या वाढत असल्याने बेसमेंटमध्ये पाणी साठवणाऱ्यांना नोटिसा बजावण्यात येत आहे. शहरात फवारणीसह भंगार टायर व इतर डासांची पैदास होणारे स्रोत हटविण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. नागरिकांनी घराभोवती स्वच्छता राखून पाणी साचू न देण्याचे आवाहन मलेरिया विभाग प्रमुख डॉ. योगेश कोशिरे यांनी केले आहे.

थोडक्यात

मॉडेल स्कूलच्या मुख्याध्यापकपदी महाले

सातपूर । मॉडर्न शाळेतील प्राथमिक विभागाचे रंजन महाले यांची कायमस्वरूपी मुख्याध्यापक पदावर निवड करण्यात आली. या त्यांच्या निवडीबद्दल शाळेतील स्कूल व्हॅन चालक-मालक संघटना तसेच शाळेतील शिक्षकांकडून रंजन महाले यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कांतिलाल महाले, बाळू पाटील, रतन एरंडे, जिजाबराव पवार, मंगेश एरंडे, नाना देवडे, निंबा पाटील, भाऊसाहेब भागवत, रावसाहेब पाटील, भाईदास माळी, कैलास देवरे, नंदू पवार व राहुल पवार आदी उपस्थित होते.

नृत्याचे सादरीकरण

नाशिक । न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या स्व. प्रभाकर पुरुषोत्तम वैशंपायन विद्यालयात विद्यार्थिनींनी सैनिकांसाठी राखी आणि पत्र पाठवण्याचा उपक्रम राबवला. रक्षाबंधन आणि स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून हा उपक्रम घेण्यात आला. प्रमुख पाहुण्या इंदिरा टेंबे, मंगल शहा, अंजली प्रधान आणि मुख्याध्यापिका सुगंधा सोनवणे यांच्या हस्ते क्रांतिकारक व जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन झाले. विद्यार्थ्यांनी आदिवासी वेशभूषा करून, नृत्य सादर केले आणि बिरसा मुंडा, राघोजी भांगरे, झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्याबद्दल माहिती दिली. युगंधरा पुणतांबेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

आदिवासी, क्रांतीदिन

सातपूर । अशोकनगर येथील मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालयात आदिवासी दिन आणि क्रांतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापक डॉ. अनिल माळी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रामा वाणी व जयराम कोदी, तसेच पालक सदस्य मीनानाथ ब्राह्मणपाडेकर हे उपस्थित होते. समीक्षा दुबे, साईनाथ जामगे, निजाम शेख, प्रांजल गायकवाड आणि वैष्णवी पवार या विद्यार्थ्यांनी माहिती सांगितली. संदीप गायकवाड यांनी माहिती दिली.

वाहतूक कोंडीचा त्रास

नवीन नाशिक । मायको सर्कल येथे सकाळी व सायंकाळच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून त्याचा त्रास वाहनचालकांना होत आहे. याठिकाणी वाहतूक पोलीस असूनही वाहतूक कोंडी होत असल्याने परिसराचे वाहतूक शाखेतर्फे सर्वेक्षण करण्याची गरज आहे.

सर्व्हिसरोडवर कचरा

नवीन नाशिक । मुंबई-आग्रा महामार्गालगतच्या सर्व्हिसरोडवर दुतर्फा कचरा साचल्याने दिसून येत असल्याने याठिकाणी ब्लॅक स्पॉट निर्माण होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. महापालिकेतर्फे याठिकाणी दररोज स्वच्छता मोहीम व कचरा टाकणाऱ्यांवर कारवाईची मागणी नागरिकांनी केली आहे.

रस्ता दुरुस्तीची मागणी

जुने नाशिक । येथील कादरी नगर परिसरातील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाली असून पादचारी तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः वृद्ध आणि लहान मुलांसाठी चालणेही धोकादायक बनले आहे. मनपाने त्वरित येथे मुरुम टाकून रस्ता दुरुस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

सायलेन्सरची चोरी

नाशिक । लेखानगर वसाहतीतील इको कारचे सायलेन्सर अज्ञात चोरट्याने चोरून नेले. मुस्ताक मुसा अतार (४०, रा.लेखानगर वसाहत, बालभारतीजवळ) यांच्या फिर्यादीनुसार, शनिवारी (दि.९) घरासमोर पार्क केलेल्या इकोकारचे ३५ हजारांचे सायलेंसर अज्ञात चोरट्याने चोरून नेले. अंबड पोलिसात गुन्हा दाखल आहे.

पथदीप मोकळे करा

जुने नाशिक । येथील प्रभाग १५ मधील पखालरोड, रॉयल कॉलनी, गोल्डन लॉन्स आदी भागातील रस्त्यावरील झाडांच्या फांद्यांची मोठी वाढ झाल्याने पथदीप झाकले गेले आहे. त्याचा प्रकाश पडत नाही. अंधारामुळे मच्छरांची संख्या वाढली आहे. तर भुरट्या चोऱ्यादेखील वाढल्या आहे. मनपाकडून येथील फांद्या छाटण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

शहरात पाच हजार तीनशे सीसीटीव्ही बसविणार

सिंहस्थ बैठक : विभागीय आयुक्तांची प्रमुख उपस्थिती

■ नाशिक । प्रतिनिधी

आगामी सिंहस्थात भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्याच्या हेतूने स्मार्ट सिटी कंपनीच्या माध्यमातून शहरात ५३०० कायमस्वरूपी सीसीटीव्ही लावण्यात येणार आहे.

त्याबाबतच्या नियोजनासाठी स्मार्ट सिटीच्या कार्यालयात मंगळवारी (दि.१२) विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त करिष्मा नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

यावेळी संबंधित सल्लागार कंपन्यांनी सीसीटीव्ही बसविण्याबाबतचे प्रेझेंटेशन अधिकाऱ्यांसमोर सादर केले. सीसीटीव्ही कोठे कोठे बसविण्यात येणार, शिवाय त्यासाठी काही अडचणी आहेत का, याचीही माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी समजून घेतली. कुंभमेळ्यासाठी नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या वाहनांवर देखील नजर ठेवली जाणार आहे.

प्राधान्यक्रमाने कामे करण्याच्या सूचना

पावसाळी विधीमंडळ अधिवेशनात १००४ कोटी रुपयांच्या पुरवण्या मागण्या मान्य करण्यात आल्याने सिंहस्थाच्या कामांना शासनाकडून आता चाल देण्यात आली आहे. त्याचबरोबर सिंहस्थ प्राधिकरणाने ३०६८ कोटी रुपयांच्या निधीची कामे प्राधान्याने हाती घेण्याची सूचना संबंधीत खात्यांना दिली आहे.

टोल नाक्यांवर होणार मोजणी

स्मार्ट सिटी कंपनीच्या वतीने शहरात १३०० सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकसह त्र्यंबकेश्वर शहरात चार हजार कायमस्वरुपी सीसीटिव्ही बसविले जाणार आहेत. या कॅमेऱ्यांचे नियंत्रण स्मार्ट सिटी कंपनी मुख्यालयातील कमांड कंट्रोल सेंटर (सीसीसी) तसेच पोलीस आयुक्तालयातील कमांड कंट्रोल सेंटरवरे केले जाणार आहे.

रोटरी क्लबतर्फे अग्निवीरांना राखी

नाशिकरोड । रक्षाबंधनानिमित्त रोटरी क्लब नाशिक पूर्वच्या वतीने आर्टिलरी सेंटर येथे अग्निवीरांना राखी बांधली. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष नविता पारख, सचिव डॉ मनीषा भुतडा, सहसचिव जुली शेरीकर, खजिनदार संगीता उपाध्ये, माजी अध्यक्ष सोनल मलानी, अर्चना लोया, राखी आव्हाड, शेरेबानू अबुजीवाला आदी उपस्थित होते.

म्हसोबा मंदिराचा जीर्णोद्धार

नवीन नाशिक । कामटवाडे गावचे अतिप्राचीन साती आसरा माता, म्हसोबा महाराज मंदिराचा जीर्णोद्धार करून देवांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

यावेळी साती आसरा माता व म्हसोबा महाराज यांची साध्या पद्धतीने कामटवाडे गावातून सर्व मंदिरांना भेट देऊन पायी मिरवणूक काढण्यात आली. मंदिरात देवांची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर महाआरती करण्यात आली. यावेळी भाजप नेते सुधाकर बडगुजर, दीपक मटाले, योगेश मटाले, उत्तम मटाले, पप्पू मटाले, बंटी मटाले, रतन मटाले, बंडू मटाले, संतोष मटाले, कैलास मटाले, गणेश मटाले व कामटवाडे ग्रामस्थ उपस्थित होते. मंदिराची प्राणप्रतिष्ठा पवन मटाले व साधना मटाले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी स्पर्धा

नाशिक । युनायटेड वे मुंबई आणि बॉस इंडिया फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्या प्रबोधिनी प्रशाला (इंग्रजी माध्यम) येथे चाईल्ड रोड सेफ्टी प्रोग्राम अंतर्गत उद्घाटन सोहळा व पोस्टर मेकिंग स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती करण्याचा उद्देश होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक नेत्रा जाधव, आरटीओ असिस्टंट इन्स्पेक्टर अश्विनी निकम, आरटीओ असिस्टंट इन्स्पेक्टर सचिन जाधव, मिलिंद वैद्य, तेजस्विनी पावसकर, करण देसाई, श्रावणी पाटील,राजन चटियार आदी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक करण देसाई यांनी केले. सूत्रसंचालन पुष्पावती टोपले व सुवर्णा पाटील तर आभार सदाशिव गणगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजन चटियार, मीनाक्षी आमले, प्राची, राणी प्रयत्न केले. कार्यक्रमात प्रतिभा पवार, वैशाली नेवे, कोमल शिंदे, राजेश घाटोळ, विकी उबाळे यांनी मेहनत घेतली.

बिबट्याची चारचाकी वाहनाला धडक

देवळाली कॅम्प । पाथर्डी-वडनेर हेगलाईनमार्गी देवळाली कॅम्पकडे येत असताना बिबट्याने चारचाकी वाहनाला धडक दिली. त्यानंतर बिबट्याने जंगलात धूम ठोकली. वडनेर दुमाला येथे दोन दिवसांपूर्वी बिबट्याच्या हल्ल्यात एका चिमुकल्याला आपला जीव गमावला लागला असून ही घटना ताजी असताना सोमवारी रात्री ८ ते ९ दरम्यान ही घटना घडली. गाडीचालक नितीन गोरे यांचा जीवाचा थरकाप उडाला. त्यांनी सांगितले की, भोलेनाथ मंदिरालगत सिंगापूर आर्मी गेट समोरुन बिबट्याने गाडीला धडक देत जंगलात धूम ठोकली.

जुना नाशिकचा वारसा टिपणारा प्रादेशिक फोटो वॉक



■ नाशिक । प्रतिनिधी

रोटरॅक्ट क्लब ऑफ नाशिक यूथ फोर्सतर्फे रामकुंड, पंचवटी येथे आयोजित प्रादेशिक फोटो-वॉकमध्ये ६० हून अधिक रोटरॅक्टर्स आणि छायाचित्रप्रेमींनी उत्साहाने सहभाग घेतला.

नाशिकचे नामांकित स्ट्रीट फोटोग्राफर्स यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी सदस्यांनी जुन्या नाशिकच्या गल्ल्या, बाजारपेठा व वास्तुकलेचे सौंदर्य टिपले. यावेळी छायाचित्रण तंत्र, टिप्सची देवाणघेवाण आणि नव्या मैत्रीचे धागे गुंफले गेले. या उपक्रमात सहा रोटरॅक्ट क्लबमधील ६०हून अधिक सदस्यांनी सहभाग नोंदविला. ज्यामुळे कला आणि स्नेहबंधाचा हा उत्सव अधिक रंगतदार ठरला. क्लबचे उद्दिष्ट अशा उपक्रमांद्वारे शिकण्याची संधी, सर्जनशीलता आणि समाजबंध वृद्धिंगत करणे आहे.

लाडकी बहीण योजना बंद केल्यास रस्त्यावरील लढा

समाजवादी पार्टी महिला सेलचा इशारा

■ नाशिक । प्रतिनिधी

राज्य शासनाने सुरु केलेली लाडकी बहीण योजना बंद केल्यास महिलांची फसवणूक होणार असल्याचे याचा परिणार समाजातील सर्वच घटकांवर होणार आहे. त्यामुळे विपरीत परिणाम होण्याचा संभव अधिक असल्याने योजना बंद केल्यास महिला रस्त्यावर उतरुन आंदोलन करतील, असा इशारा समाजवादी पक्षाच्या महिला सेलतर्फे जिल्हाधिकार्यांना देण्यात आला.

महाराष्ट्र सरकारने निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सर्वच महिला भगिनींना लाडकी बहीण योजनेत सहभागी होण्यासाठी आश्वासने देवून त्यांना सुरुवातीस पात्र, अपात्र असे कोणतेही निकष न लावता सरसकट सर्वांना योजनेचा लाभ दिला. परंतु सरकारच्या तिजोरीवर विपरीत परिणाम होतो असे लक्षात आल्यानंतर लाडकी बहीण योजना बंद करण्याचे नियोजन आखण्यास सरकारने सुरुवात केलेली आहे. त्यांनी महिलांना पात्र अपात्र ठरविण्यासाठी कागदी घोडे नाचवुन महाराष्ट्रातील सुमारे ४० ते ४५ टक्के महिलांच्या भावनांशी खेळून त्यांचा अपेक्षाभंग केला, योजना बंद झाल्यास, समाजवादीपार्टीतर्फे महिला रस्त्यावर उतरुन लाडक्या बहीणींसाठी न्याय मागतील असा इशारा निलोफर आझाद, नरसोबा काकडे, यास्मिन खान, मुस्कान शेख, अंजुम सय्यद, बानो शेख, अदि महिला पदाधिकाऱ्यांद्वारे निवासी उपजिल्हाधिकारी रोहीत कुमार राजपूत यांना निवेदनात देण्यात आले.

युग प्रवर्तक-डॉ. हेडगेवार नाटकाला प्रतिसाद

■ नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने नादब्रह्मनिर्मित आणि युगसंधान प्रस्तुत, युगप्रवर्तक- डॉ. हेडगेवार या हिंदी नाटकाचा प्रयोग नाशिकच्या कालिदास कला मंदिर येथे सादर करण्यात आला. नाटकास नाशिककरांचा भरघोस प्रतिसाद लाभला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या निष्काम कर्मयोग, सेवाकार्य व सर्वस्वी त्याग समर्पणाची ही गाथा! त्यांचे विचार, प्रखर राष्ट्रभक्ती, समर्पण आणि संस्कार यांची नवीन पिढीमध्ये रुजवण व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून डॉ. अजय प्रधान यांनी या नाटकाचे लेखन केले. त्यांच्या समर्थ, सिद्ध आणि प्रेरित लेखणीतून या महान नाटकाची निर्मिती झाली आहे. नागपुरातील ज्येष्ठ रंगकर्मी, उत्कृष्ट कलावंत आणि प्रतिभावान दिग्दर्शक सुबोध सुर्जीकर यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी आपले संपूर्ण जीवन हिंदू समाज जागरण आणि त्याचे संघटन यासाठी समर्पित केले. अशा महान व्यक्तिमत्वाचे अनमोल कार्य सर्व समाजबांधव तसेच पुढील पिढीपर्यंत पोहचावे हा या नाटकाच्या प्रस्तुतीकरणाचा मूळ उद्देश आहे. ह्या नाट्य मंचनाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने तसेच भारत माता, डॉ. हेडगेवार, गुरुजींच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. त्यानंतर महाराष्ट्रगीत झाले. व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक रवींद्र भुसारी नाद ब्रह्मचे उपाध्यक्ष उदय काळे, सचिव सुधीर वारकर, संघचालक ग्रामीणचे साहेबराव पाटील, संघांचे शहरी विभाग संघचालक डॉ. विजय मालपाठक, भारत विकास परिषदेचे माजी राष्ट्रीय प्रकल्प सचिव सुधीर पाठक, संस्कार भारतीचे रवी बेडेकर, भाजपचे ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मण सावजी, मंगला सौदीकर, सुहास वैद्य मंचावर उपस्थित होते. प्रेक्षकांनी सभागृह भरगच्च भरले होते. नाटकातील सर्व कलावंतांच्या उत्तम प्रस्तुतीकरणामुळे सर्व मान्यवर तसेच रसिक प्रेक्षक भारावून गेले. सूत्रसंचालन अनिल भालेराव यांनी केले.

वितरण अधिकाऱ्यांना धरले धारेवर

■ नाशिक । प्रतिनिधी

उबाठा पक्षाच्या रणरागिणी आक्रमक

शहरातील धान्य वितरण कार्यालयाच्या मनमानी कारभाराविरोधात शिवसेना (उबाठा) पक्षाने सोमवारी जोरदार निषेध नोंदवला. महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरून तातडीने कामात सूधारणा करण्याचा इशारा दिला.

गोरगरीब जनतेच्या मूलभूत हक्कांवर घाला घालण्याचे काम शहरातील धान्य वितरण कार्यालयाकडून सुरू असल्याचा आरोप करत, कार्यालयाच्या प्रमुख धपाडे यांना थेट जाब विचारण्यात आला.

प्रशासनाच्या मनमानी कारभार तत्काळ थांबवून नियमानुसार चौकटीत कामकाज करावे, तसेच जनतेच्या विविध समस्या त्वरित सोडवाव्यात, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यात तातडीने सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी संपर्कप्रमुख रिटा वाघ, योगिता गायकवाड, कीर्ती निरगुडे, शोभा दिवे, शोभा पवार, शोभा वालडे, चित्रा ढिकले, सुवर्ण काळुंगे, माधुरी पाटील, ज्योती कुमावत व खेताडे यांच्यासह पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख दिलीप मोरे व मुकुंद कांबरी यांची उपस्थिती होती.

चालिहा उत्सवाअंतर्गत विविध कार्यक्रम

नाशिक । सिंधी समाजाच्या चालिहा उत्सवानिमित्त आयोजित विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांना समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

रामकुंडावर पार पडलेल्या गोदाआरतीत समाज बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यानंतर नदीत दिवे अर्पण करताना गोदावरीप्रती श्रद्धाभाव व्यक्त केला. नाशिक सिंधी पंचायततर्फे चालिहा उत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. चालिहा उत्सवाअंतर्गत रोज विविध आरती, प्रसादवाटप व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. चालिहा महोत्सवाच्या उत्तरार्धात विविध उपक्रम पार पडणार असून, शुक्रवारी (दि.१५) निफाड तालुक्यातील हिंगलाज माता मंदिरात सहलीचे आयोजन केले आहे. श्री झुलेलाल मंदिरापासून बसगाडी उपलब्ध राहाणार असून, समाज बांधवांनी या उपक्रमामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन नाशिक सिंधी पंचायतचे अध्यक्ष .प्रकाश आहुजा, उपाध्यक्ष श्याम मोटवानी, सरचिटणीस शंकर जयसिंघानी यांनी केले आहे.

पाणीवापर संस्था पुरस्कारासाठी आवाहन

■ नाशिक । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था व्यवस्थापन पुरस्कारासाठी ऑनलाइन पद्धतीने ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत नामांकन सादर करावे, असे आवाहन पालखेड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता वैभव भागवत यांनी केले आहे.

जलसंपदा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अर्जाची लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. या पुरस्कारासाठी जुलै २०२३ ते जून २०२४ आणि जुलै २०२४ ते जुलै २०२५ या कालावधीत संस्थांनी केलेल्या कामांची मुद्देनिहाय माहिती नमूद करणे बंधनकारक आहे. संबंधित समिती व शासन निर्णयाचा आधार घेऊन नामांकन प्रक्रिया पूर्ण करावी.

वॉर्ड क्र. सातमध्ये औषध फवारणी करा

■ देवळाली कॅम्प । प्रतिनिधी

येथील कॅन्टोन्मेन्ट बोर्ड वॉर्ड क्र. ७ मधील धोंडीरोड, शिंगवे बहुला, अंबडवाडी, सोन्यावाडी, चारणवाडी या परिसरात स्वच्छता होत नसल्याने मच्छरांचा उपद्रव वाढला आहे.

लहान मुलांसह नागरिक हैराण झाले असून कँन्टोन्मेट बोर्ड प्रशासनाने वॉर्डात स्वच्छता करत औषध फवारणी करावी, अशी मागणी रिपाइंचे युवक शहराध्यक्ष रवींद्र गायकवाड यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

सप्लाय डेपो रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

देवळाली कॅम्प । सिलेक्शन कॉनर ते सप्लाय डेपोपर्यंतच्या रस्त्याची अत्यंत दूरवस्था झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व कँन्टोन्मेट बोर्ड प्रशासनाने त्वरित डागडुजी करावी अन्यथा शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

नाशिकरोडहून देवळाली कॅम्प, भगूरसह सिन्नर व इगतपुरी तालुक्यांतील काही खेडेगावांना जोडणारा लॅमरोड हा महत्त्वाचा रस्ता असून सध्या या रस्त्याची सिलेक्शन कॉनर ते सप्लाय डेपोपर्यंत चाळण झाली आहे. मोटरसायकलसह चारचाकी वाहनधारकांसह शेतकऱ्यांना भाजीपाला मार्केटमध्ये घेऊन जाण्यास अडचण निर्माण होत असून छोटेमोठे अपघात होत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग व कँन्टोन्मेट बोर्ड प्रशासनाने या रस्त्याची दुरुस्ती करावी अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शिवसेना उबाठा पक्षाने दिला आहे.